# नियामक मंडळाची २० वी बैठक दि.२२.०३.२०००

मा. ना. अजित पवार, मा. मंत्री, पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण महामंडळ) व फलोत्पादन आणि अध्यक्ष (मकृखोविम) यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची २० वी बैठक दि.२२.०३.२००० रोजी विधान भवन, मुंबई येथे संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये खालील ठराव पारित करण्यात आले.

ठराव क्र. २०/१

``ठराव करण्यात येतो की १९ व्या बैठकीमध्ये पारित झालेले ठराव कायम करण्यात येत आहेत.``

ठराव क्र. २०/२

`` ठराव करण्यात येतो की, परिशिष्ट क्र.२ मधील बिगर सिंचन पाणी पुरवठा परवाने मिळण्याबाबतच्या ३ योजनांचे प्रस्तावांना, `सदर प्रस्तावांचा पाणीवापर संबंधित प्रकल्पांच्या सुधारित जलनियोजनामध्ये समावेश केला जाईल व दोन महिन्यांच्या पाणीपट्टीएवढी अनामत रक्कम पाणीवापर करणारी संस्था महामंडळाकडे भरेल. तसेच १९९० च्या शासन निर्णयानुसार आवश्यक तो संतुलन साठा (Balancing storage) स्वखर्चाने करील,` या अटींवर नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

वरील तीन योजनांचे मंजूरीचे आदेश, जोपर्यंत पाणी वापर करणारी संबंधित संस्था वरील योजनांबाबतची आवश्यक ती संपूर्ण रक्कम महामंडळास अदा करीत नाहीत तोपर्यंत वरील तीन योजनांचे मंजूरीचे आदेश,निर्गमित करण्यात येऊ नयेत.``

ठराव क्र.२०/३

``ठराव करण्यात येतो की, परिशिष्ट क्र.४ व ५ मध्ये दर्शविलेल्या १ मोठे,२ मध्यम व १३ लघु प्रकल्पांच्या अंदाजपत्रकांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यास नियामक मंडळाची मंजुरी देण्यात येत आहे.``

ठराव क्र. २०/४

``ठराव करण्यात येतो की, उद्दिष्टपूर्तीसाठी आखलेला कार्यक्रम पूर्ण करण्याचे अनुषंगाने वर्ष १९९९-२००० करिताचे सुधारित अंदाजपत्रक रु.४२४८.९३ कोटी आणि वर्ष २०००-२००१ या आर्थिक वर्षाच्या रु.४१०३ कोटींच्या अर्थसंकल्पास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. या अर्थसंकल्पास शासनाची मान्यता घेण्यात यावी.``

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

ठराव क्र. २०/५

''ठराव करण्यात येतो की,

१. महामंडळाच्या अधिनियमातील कलम ३१ मधील तरतुदींनुसार महामंडळास शासनाकडून देय अंशदानाचा ४ वर्षाच्या अनुशेष रु.१६३५.८८ कोटी व सन २०००-२००१ चे अंशदान रु.७०० कोटी असे एकूण रु.२३३५.८८ कोटींचे अंशदान महामंडळास मे २००० पूर्वी ३ समान हप्त्यांत प्रदान करणेविषयी शासनास विनंती करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. तसेच त्यातील पहिला हप्ता रु.७७८.६२ कोटी दि.३१.०३.२००० पूर्वी प्रदान करणेबाबत शासनास आग्रहपूर्वक कळकळीची विनंती करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

२. महामंडळाच्या कर्जरोखे मालिका-७ मध्ये उभारलेला रु.१५७.८९ कोटींचा निधी १८० दिवसाच्या कालावधी झाल्यावर संबंधित गुंतवणूकदारांना व्याजासह परत केला असून तो महामंडळाकडील निधी वळवून परत केला असल्याने तेवढा निधी रु.१५७.८९ कोटी सद्य:स्थितीत महामंडळ आर्थिक पेच प्रसंगातून जात असल्याने ती रक्कम दि.३१ मार्च २००० पूर्वी तातडीने महामंडळास प्रदान करणेविषयी शासनास विनंती करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

३. महामंडळाच्या कर्जरोखे मालिका २०००/अे मधील इंस्ट्रूमेंट 'अ' खाली गुंतविलेल्या गुंतवणूकदारांना ६ महिन्याचे शेवटी परतफेड मिळणेबाबतचा विकल्प दिल्यामुळे वित्तीय वर्ष २०००-२००१ मध्ये निर्माण होणाऱ्या दायित्वासाठी त्या वर्षाच्या अर्थसंकल्पाच्या पुरवणी मागणीद्वारे प्रत्यक्ष गुंतविलेल्या व महामंडळाने ठेवून घेतलेल्या रकमेएवढी तरतूद करणेबाबत शासनास विनंती करण्यास नियामक मंडळाची मान्यता आहे.''

ठराव क्र.२०/६

''ठराव करण्यात येतो की, शासन हमीवर युनायटेड वेस्टर्न बँक, कॅम्प शाखा, पुणे व कॅनरा बँक, कॅम्प शाखा, पुणे यांचेकडून घेतलेल्या प्रत्येकी रु.६० कोटी कर्जाचे परतफेडीस दि.३१.०३.२००१ अखेर मुदतवाढ देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. ''

ठराव क्र.२०/७

''ठराव करण्यात येतो की,

१. कृष्णा खोऱ्यातील प्रकल्पांची निरीक्षणे करण्यासाठी मा.मंत्री, पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोंकण महामंडळ) यांच्या वापरासाठी एक ॲम्बेसिडर हे वाहन खरेदी करण्यास त्याचप्रमाणे पाटबंधारे विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडे पाठविण्यासाठी दोन ॲम्बेसिडर कार खरेदी करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

२. वरील १ प्रमाणे तीन ॲम्बेसिडर कार खरेदी करण्यासाठी आवश्यक तो खर्च करण्याचे अधिकार शासनाच्या मान्यतेच्या अधीन राहून कार्यकारी संचालक यांना देण्यात येत आहेत.''

ठराव क्र. २०/८

''ठराव करण्यात येतो की,

१. क्षेत्रीय कार्यकारी अभियंतांच्या कार्यालयीन कामकाजांसाठी तसेच क्षेत्रीय भेटींसाठी ६ ॲम्बेसिडर कार खरेदी करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

२. वरील १ प्रमाणे ६ ॲम्बेसिडर कार खरेदी करण्यासाठी आवश्यक तो खर्च करण्याचे अधिकार शासनाच्या मान्यतेच्या अधीन राहून कार्यकारी संचालक यांना देण्यात येत आहेत.''

ठराव क्र. २०/९

''ठराव करण्यात येतो की, कुकडी डावा कालवा किमी ४ मधील गट क्र.३२९/अ मधील डाव्या बाजूचे १.६० हेक्टर क्षेत्र, कै.दत्तुबाबा लेंडे स्मृती प्रतिष्ठान पिपळवंडी ता.जुन्नर, जि.पुणे या नोंदणीकृत संस्थेस प्रचलित नियमानुसार भाडेपट्टयाने देण्यासाठी नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र.२०/१०

''ठराव करण्यात येतो की, नियामक मंडळाच्या १६ व्या बैठकीतील मंजूर ठराव क्र.१६/७(१) नुसार मान्यता दिलेल्या पाणीपट्टीच्या दरातील परिशिष्ट क्र.३/१ व परिशिष्ट क्र.३/२ मध्ये नमूद केलेले खाजगी उपसा योजनेचे दर सोबतच्या सुधारित परिशिष्ट क्र.३/१ व ३/२ नुसार सुधारित करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. सदरचे दर दि.०१.०७.९८ ते दि.३०.०६.९९, दि.०१.०७.९९ ते ३०.०६.२००० व दि.०१.०७.२००० ते ३०.०६.२००१ या तीन सिंचन वर्षासाठी लागू राहतील.''

ठराव क्र. २०/११

''ठराव करण्यात येतो की,

१. महामंडळाच्या कार्यकक्षेतील मोठे, मध्यम व लघु प्रकल्पांच्या जलाशयावर मत्स्योत्पादन व मत्स्यव्यवसायाचे लिलाव अधिनियम क्र.१५/०४.०४.९६ मधील कलम १९(ड) नुसार महामंडळाने करावेत व लिलावाची कार्यवाही नियामक मंडळाच्या दि.२९.०४.९७ च्या ११व्या बैठकीतील मंजूर ठराव क्र.११/४ नुसार करण्यात यावी.

२. ज्या जलाशयांवर मत्स्यव्यवसाय विभागाने महामंडळ स्थापनेपूर्वी लिलाव निश्चित केले आहेत व ज्या ठिकाणी सदर लिलावांचा कालावधी समाप्त झाला आहे, अशा ठिकाणी यापुढे मत्स्यव्यवसाय विभागाने नवीन लिलाव काढू नयेत व या जलाशयांवर यापुढे

महामंडळाने मत्स्यउत्पादनाबाबत लिलावांची कार्यवाही करावी. लिलावांची कार्यवाही शासन निर्णय (मत्स्य विभाग) क्र.१२६१/सीआर/१३५/पदुम-१३ दि.२९.०६.१९९५ मधील मार्गदर्शक तत्वानुसार करण्यात यावी.

३. वरील १ व २ प्रमाणे कार्यवाही महामंडळामार्फत केली जात असल्याचे शासनाच्या निदर्शनास आणावे व या कार्यवाहीस शासनाची मान्यता मिळण्याबाबत विनंती करावी.''

ठराव क्र. २०/१२

''ठराव करण्यात येतो की,

अ. कृष्णा पाणी तंटा लवादाचे संदर्भातील कामाची संपूर्ण कार्यवाही महाराष्ट्राच्या बाजूने परिपूर्णतेने करता यावी या दृष्टीने मुख्य अभियंता (हे पद नियामक मंडळाच्या १९ व्या बैठकीत मंजूर करण्यात आले आहे) यांच्या अधिपत्याखाली कृष्णा पाणी वाटप तंटा लवाद कार्यकारी गट परिशिष्ट क्र.५ नुसार स्थापन करण्यास व अधीक्षक अभियंता यांचे एक पद व निम्नस्तर लघुलेखक - २ पदे, उच्चस्तर लघुलेखक -२ पदे, कॉम्प्युटर ऑपरेटर - २ पदे नव्याने निर्माण करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत असून ही पदे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास पाठविण्यात यावा.

ब. कृष्णा पाणी तंटा लवाद निर्णयासंदर्भात महाराष्ट्राची बाजू समर्थपणे मांडण्यासाठी श्री. टी. आर. अंध्यारुजीना, कायदा सल्लागार यांच्या सूचनेप्रमाणे कायदा सल्लागारांचे पॅनेल नेमण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. कायदा सल्लागारांचे मानधनाचे दर मा.अध्यक्षांच्या मान्यतेने ठरविण्यात यावेत.''

| | |
|---|---|
| मा. मंत्री (पा) व अध्यक्ष | कार्यकारी संचालक |
| म.कृ.खो.वि.म., पुणे | म.कृ.खो.वि.म. पुणे |

# म  राष्ट्र कृष्णा खोरे विकास महामं ळ, पुणे.

## परिशिष्ट क्रमांक - ३/१

## उपसा सिंचनावरील पाणीपट्टीचे दर - ०१.०७.१९९८ पासून लागू

## (खाजगी उपसा सिंचन योजनेच्या पाणी वापराबद्दल)

(रूपये प्रती हेक्टर)

| अ.क्र. | उपसा सिंचनाचे ठिकाण | उस व केळी पिकांसाठी दर | | | इतर बारमाही पिकांसाठी दर | | | खरीप पिकांसाठीचे दर | | रब्बी पिकांसाठीचे दर | | उन्हाळी पिकांसाठीचे दर | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १.७.९४ पासून दर | प्रस्तावित | | १.७.९४ पासून दर | प्रस्तावित | | १.७.९४ पासून दर | प्रस्तावित | १.७.९४ पासून दर | प्रस्तावित | १.७.९४ पासून दर | प्रस्तावित |
| | | | पाटाचे | ठिबक सिंचन | | पाटाचे | ठिबक सिंचन | | | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| १ | कालवा | ७५० | १५०० | १००० | ५०० | १५०० | १००० | ५० | १०० | ७५ | १५० | १५० | ३०० |
| २ | जलाशय | ३७५ | ७५० | ५०० | २५० | ७५० | ५०० | २५ | ५० | ३७.५ | ७५ | ७५ | १५० |
| ३ | धरण व उंचावणीचा बंधारा | ३७५ | ७५० | ५०० | २५० | ७५० | ५०० | २५ | ५० | ३७.५ | ७५ | ७५ | १५० |
| ४ | उंचावणीचा बंधारा | ३७५ | ७५० | ५०० | २५० | ७५० | ५०० | २५ | ५० | ३७.५ | ७५ | ७५ | १५० |
| ५ | लाभक्षेत्र मर्यादिमधील नदी | १८७.५ | ३७५ | २५० | १२५ | ३७५ | २५० | १२.५ | २५ | २० | ४० | ३७.५ | ८० |
| ६ | बंधाऱ्याच्या (फुगवटयाच्या) क्षेत्रात परंतु जेथे वरील धरणातून पाणी सोडण्यात येत नाही | १८७.५ | ३७५ | २५० | १२५ | ३७५ | २५० | १२.५ | २५ | २० | ४० | ३७.५ | ८० |
| ७ | नदी नाल्यावरील पहिला बंधारा किंवा धरणाच्या पलिकडील भागातून उपसा सिंचन | ६२.५ | १२५ | ८५ | ४० | १२५ | ८५ | निरंक | निरंक | १२.५ | १५ | १२.५ | ३० |
| ८ | खरीपातील वळवणीचा बंधारा | ६२.५ | १२५ | ८५ | ४० | १२५ | ८५ | निरंक | निरंक | १२.५ | १५ | १२.५ | ३० |

अ) कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यातून, नदीतून पाणी उचलून वाढवा धरून उस बागायतीसाठी करण्यात आलेल्या खाजगी उपसा सिंचन योजनांच्या पाणी वापराबद्दलचे पाणीपट्टीचे दर (लागण केल्यापासून पीक निघेपर्यंत) खालील प्रमाणे असतील.

दर रूपये प्रति हेक्टर

| | १.७.९४ पासुन दर | प्रस्तावित | |
|---|---|---|---|
| | | प्रवाही | ठिबक |
| १. अधिसूचित नद्या की, जेथे धरणाच्या पाणाच्या साठ्यामधून बारमाही पाणी सोडण्यात येते. | ४६८.७५ | ९५० | ६४० |
| २. ज्या ठिकाणी कोल्हापूर पध्दतीचे बंधारे आहेत, अशा नद्यांवर जेथे वरील धरणातून पाणी सोडण्यात येत नाही | २३५ | ६६० | ४४५ |
| ३. ज्या ठिकाणी साठवणीचा फायदा नाही अशा नदीतून. | ७५ | १६५ | ११० |



मा. मंत्री ( पा.) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म.पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म.पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे.

( परिशिष्ट क्रमांक -३/२

## उपसा सिंचनावरील पाणीपट्टीचे दर - ०१.०७.१९९९ पासून लागू

**(खाजगी उपसा सिंचन योजनेच्या पाणी वापराबद्दल)** **(रूपये प्रती हेक्टर)**

| अ.क्र. | उपसा सिंचनाचे ठिकाण | उस व केळी | | इतर बारमाही | | खरीप पिके | रब्बी पिके | उन्हाळी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रवाही | ठिबक सिंचन | प्रवाही | ठिबक सिंचन | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | कालवा | १५०० | १००० | १५०० | १००० | १०० | १५० | ३०० |
| २ | जलाशय | ७५० | ५०० | ७५० | ५०० | ५० | ७५ | १५० |
| ३ | धरण व उंचावणीचा बंधारा | ७५० | ५०० | ७५० | ५०० | ५० | ७५ | १५० |
| ४ | उंचावणीचा बंधारा | ७५० | ५०० | ७५० | ५०० | ५० | ७५ | १५० |
| ५ | लाभक्षेत्र मर्यादेमधील नदी | ३७५ | २५० | ३७५ | २५० | २५ | ४० | ८० |
| ६ | बंधाऱ्याच्या (फुगवटयाच्या) क्षेत्रात परंतु जेथे वरील धरणातून पाणी सोडण्यात येत नाही | ३७५ | २५० | ३७५ | २५० | २५ | ४० | ८० |
| ७ | नदी नाल्यावरील पहिला बंधारा किंवा धरणाच्या पलिकडील भागातून उपसा सिंचन | १२५ | ८५ | १२५ | ८५ | निरंक | १५ | ३० |
| ८ | खरीपातील वळवणीचा बंधारा | १२५ | ८५ | १२५ | ८५ | निरंक | १५ | ३० |

अ) कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यातून, नदीतून पाणी उचलून वाढवा धरून उस बागायतीसाठी करण्यात आलेल्या खाजगी उपसा सिंचन योजनांच्या पाणी वापराबद्दलचे पाणीपट्टीचे दर (लागण केल्यापासून पीक निघेपर्यंत) खालील प्रमाणे असतील.

| | (दर रूपये प्रति हेक्टर) | |
|---|---|---|
| | प्रवाही | ठिबक |
| १. अधिसूचित नद्या की, जेथे धरणाच्या पाण्याच्या साठ्यामधून बारमाही पाणी सोडण्यात येते | ९५० | ६४० |
| २. ज्या ठिकाणी कोल्हापूर पध्दतीचे बंधारे आहेत, अशा नद्यांवर जेथे वरील धरणातून पाणी सोडण्यात येत नाही. | ६६० | ४४५ |
| ३. ज्या ठिकाणी साठवणीचा फायदा नाही अशा नदीतून | १६५ | ११० |

**मा. मंत्री ( पा.) व अध्यक्ष**
**म.कृ.खो.वि.म.पुणे**

**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म.पुणे**

परिशिष्ट क्र.४

## सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान केलेले प्रकल्प

| क्र. | प्रकल्पाचे नाव | सुधारित प्रशासकीय मान्यतेची किमत रु.लक्ष |
|---|---|---|
| **अ)** | **मोठे प्रकल्प** | |
| १. | नीरा देवधर प्रकल्प ता.भोर, जि.पुणे | ५८८६५.२४ |
| **ब)** | **मध्यम प्रकल्प** | |
| १. | चित्री प्रकल्प ता. आजरा, जि.कोल्हापूर | ७९९४.०६ |
| २. | खैरी प्रकल्प जि. अहमदनगर | १९४४.२६ |
| **क)** | **लघु प्रकल्प** | |
| | *जिल्हा पुणे* | |
| १. | को.प.बंधारा, सोनवडी, ता.दौंड | ४०७.३८ |
| १. | को.प.बं. वडगांव बांडे, ता. दौंड | ८९.२० |
| २. | को.प.बं. पाटगांव, ता.दौंड | ३१३.४७ |
| ३. | ल.पा. तलाव महाकोशी, ता.भोर | २६२.९३ |
| ४. | को.प.बं. कऱ्हावागज, ता.बारामती | ८६.३७ |
| ५. | को.प.बं. कान्हाटी, ता.बारामती | ९२.२१ |
| ६. | को.प.बं. मुरुम, ता.बारामती | १७३.८७ |
| ७. | को.प.बं. अण्णापूर, ता.शिरुर | ५८.२५ |
| | *जिल्हा अहमदनगर* | |
| १. | को.प.बं. धनगरवाडी, ता.श्रीगोंदा | १६६.४८ |
| | *जिल्हा सांगली* | |
| १. | ल.पा.तलाव शिवणी, ता.शिराळा | ९८.३६ |
| २. | ल.पा.तलाव गुगवाड, ता.जत | ६०.०८ |
| ३. | ल.पा.तलाव सनमडी, ता.जत | १३१.३८ |
| ४. | ल.पा.तलाव अंत्री, ता.शिराळा | १६४.३३ |

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

परिशिष्ट क्र.५

# कृष्णा पाणी वाटप तंटा लवाद कार्यकारी गट

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | मुख्य अभियंता (गट प्रमुख) | - | १ पद - नवीन | |
| २. | अधीक्षक अभियंता | - | १ पद - नवीन | |
| ३. | कार्यकारी अभियंता | - | २ पदे | अस्तित्वातील पदे वर्ग करुन |
| ४. | उप विभागीय अभियंता | - | ४ पदे | |
| ५. | सहाय्यक अभियंता/शाखा अभियंता | - | ८ पदे | |
| ६. | आरेखक | - | १ पद | |
| ७. | अनुरेखक | - | ३ पदे | |
| ८. | अधीक्षक | - | १ पद | |
| ९. | प्रथम लिपिक | - | २ पदे | |
| १०. | वरिष्ठ लिपिक | - | २ पदे | |
| ११. | कनिष्ठ लिपिक | - | ३ पदे | |
| १२. | टंकलेखक | - | ४ पदे | |
| १३. | दप्तरी | - | १ पद | |
| १४. | शिपाई | - | ८ पदे | |
| १५. | चौकीदार | - | २ पदे | |
| १६. | वाहन चालक | - | ४ पदे | |
| १७. | उच्चस्तर लघुलेखक | - | २ पदे - नवीन | |
| १८. | निम्नस्तर लघुलेखक | - | २ पदे - नवीन | |
| १९. | कॉम्प्युटर ऑपरेटर | - | २ पदे - नवीन | (वेतनश्रेणी कनिष्ठ अभियंता पदाची) |

(टीप: क्र. ३ ते १६ — अस्तित्वातील पदे वर्ग करुन)

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे